दि.२७/११/२०१९

आज दि. २७/११/२०१९ रोजी पोलीस कर्तव्य मेळावा मधील स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी एकुण ४ स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये १) 'सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन' यामध्ये पोलीस ऑफिसर्स फोटोग्राफी, २) अॅन्टी सबोटेज (व्हेईकल सर्च), ३) कम्प्युटर अवेरनेस या स्पर्धा आज घेण्यात आल्या.

'फोटोग्राफी' हा पोलीस तपासामध्ये महत्वाचा विषय असुन घटनास्थळावरील फोटो हे दोषसिध्दीच्यावेळी न्यायालयात निर्णायक व विशिष्ट पुरावा ठरू शकतात त्यादृष्टीने ही स्पर्धा आयोजित केली जाते.

आज झालेल्या 'सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन' यामध्ये पोलीस ऑफिसर्स फोटोग्राफी या स्पर्धेत एकुण ३४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा प्रकारामध्ये सर्वात्तम कामगिरी करत कोकण रेंजच्या सहा. पोलीस निरीक्षक एल्.बी.बोरा ( ९२/१०० गुण) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर पुणे शहरच्या सहा. पोलीस निरीक्षक अर्चना पाटील यांनी ( ८७/१०० गुण) व्दितीय क्रमांक मिळवला.

तर नवी मुंबईच्या मनिषा काशिद यांनी ( ८४/१०० गुण) तृतीय क्रमांक मिळवला.

सध्याच्या डिजिटल युगामध्ये डिजिटल पुरावा व कम्प्युटरचे ज्ञान तपासण्यासाठी कम्प्युटर अवेरनेस ही स्पर्धा आयोजित केली जाते.

'कम्प्युटर अवेरनेस' या प्रकारामध्ये एकुण ४३ स्पर्धक सहभागी झाले होते. नांदेड रेंजचे पोशि गौस खान व पोशि इर्फानखान पठाण (६७/१००गुण) यांनी प्रथम क्रमांक, तर कोकण रेंजचे पोशि उमेश शिंदे व पोशि प्रकाश चव्हाण (५७/१००गुण) यांनी व्दितीय क्रमांक व कोल्हापूर परिक्षेत्राचे पोशि निखील जाधव व पोशि प्रसाद मांढरे (५६/१००गुण) यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

'अॅन्टी सबोटेज अॅक्सेस कंट्रोल' ही स्पर्धा गर्दीमध्ये संशयस्पद वस्तू घेवून जाणाऱ्या व्यक्तीला हेरून घातपात रोखण्यासाठी स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेमध्ये एकुण ३ मिनिटांचा कालावधी स्पर्धकाला दिला जातो व लोकांच्या गर्दीमध्ये एक व्यक्ती संशयास्पद वस्तू त्याच्या शरिरावर, लपवुन या गर्दीत मिसळवला जातो. स्पर्धक केवळ ३ मिनिटांचा कालावधीमध्ये गर्दीमधील कोणती व्यक्ती

संशयास्पद वस्तू घेवून चाललेली आहे, ती घातपातविरोधी उपकरणांच्या सहाय्याने शोधून काढून आपले कौशल्य सिध्द करतो.

या स्पर्धा प्रकारात कोकण रेंजचे पोना आर. आर. कुटे यांनी सर्वेत्तम कामगिरी करत (८४/१००गुण) सुवर्णपदक पटकावले, तर एम्आयएचे पोहवा ए. डी. गाडे (६८/१००गुण) यांनी रौप्यपदक पटकावले, तर फोर्स वनचे पोशि डी.बी शेटे (६१.५/१००गुण)यांनी कांस्य पदक पटकावले.

समारोप समारंभ दि. ३०/११/२०१९ रोजी सायंकाळी ०३:५० वा. परेड ग्राऊंड, रा.रा.पो.बल गट क्र. २, रामटेकडी येथे आयोजित करण्यात आला असुन त्याचे प्रमुख पाहुणे मा. एस्.के.जायसवाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे आहेत.

दि. २७/११/२०१९

आज रोजी १७ वा महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याचा उद्‌घाटन सोहळा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. के. वेंकटेशम्, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या शुभहस्ते व अध्यक्ष श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, सीआयडी, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला.

सहभागी स्पर्धक संघानी मान्यवरांना लयबध्द व शिस्तबध्द संचलन करून मानवंदना दिली. त्यानंतर श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक, सीआयडी, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरूवात केली. त्यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा उद्‌देश व ध्येय याबाबत मनोगत व्यक्त करताना माहिती दिली की, दरवर्षी महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या वतीने आयोजित केला जातो. स्पर्धेचा उद्देश हा पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्यावसायिक कौशल्य, नैपुण्य व कार्यक्षमता यांचा दर्जा वाढविणे आहे. सदर पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये वेगवेगळ्या ६ प्रकारच्या स्पर्धांचा समावेश

असतो. १७ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये ९ परिक्षेत्र, १० आयुक्तालये, गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य राखीव पोलीस बल, बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, दहशतवाद विरोधी पथक, फोर्स वन मुंबई, राज्य गुप्तवार्ता विभाग असे २५ संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतुन यशस्वी झालेले अधिकारी व कर्मचारी यांची निवड अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याकरीता करण्यात येते. अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघाची कामगिरी अधिक सक्षमपणे उंचविण्यासाठी ,अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामधील पदक विजेत्या पोलीस अधिकाऱ्यांना प्रोत्साहनपर रोख बक्षीस देण्यात येते. संघामध्ये उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांची निवड करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात येत आहे.

त्यांनी पुढे विशेष आनंद होत असल्याचे सांगुन माहिति दिली की, ६२ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा दि.१६/०७/२०१९ ते दि.२०/०७/२०१९ दरम्यान लखनऊ, उत्तरप्रदेश येथे संपन्न झाला. त्यामध्ये संपुर्ण देशातुन एकुण २७ राज्य/संघराज्याच्या संघानी सहभाग नोंदविला होता. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाच्या वतीने एकुण ४० स्पर्धक सहभागी झाले होते. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाने पहिल्यांदाच **देशातील प्रथम क्रमांकाचा संघ**

**म्हणुन जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी** मिळवुन महाराष्ट्र पोलीस दलासाठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे **Scientific Aid to Investigation** (विज्ञानशास्त्राची तपासात मदत) या स्पर्धा प्रकारामध्ये **हार्ड लाईनर ट्रॉफी** व पोलीस व्हिडीओग्राफी या स्पर्धेची **रनरअप ट्रॉफी** मिळवुन दैदिप्यमान कामगिरी केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे संघाने ५ सुवर्ण , ३ रौप्य व ४ कास्यं असे एकुण १२ पदके प्राप्त केली आहेत.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. के. व्यंकटेशम्, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी त्यांच्या भाषणामध्ये पोलीस दलामध्ये पोलीसांना कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे तपास व गुन्हे नियंत्रण ही महत्वाची कामे करावी लागतात. त्यामधील सर्वात महत्वाचे आव्हानात्मक काम म्हणजे क्लिष्ट गुन्हयांची उकल करणे. पुर्वीच्या काळी गुन्हयांची तसेच गुन्हेगारांची संख्या कमी होती. त्यांची गुन्हे करण्याची पध्दती व त्या अनूषंगाने गुन्हयाची तपासपध्दती यामध्ये ठराविक साचेबध्द पध्दत होती. मात्र जसजसे विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये प्रगती होत गेली, दळणवळण व संपर्काची साधने प्रगत होवुन संपर्क सोपा व अडथळा विरहित झाला. याचा थेट परिणाम गुन्हेगार व त्यांच्या गुन्हे करण्याच्या पध्दतीवर झाला. त्यामुळे गुन्हेगारांची संख्या

वाढत गेली. परिणामत: पोलीसांना देखील आपला तपास करताना तपास कौशल्याचा जास्तीत जास्त प्रभावीपणे वापर व्हावा व तपास करताना आधुनिक तपास पध्दतीमध्ये न्याय वैज्ञानिकशास्त्र, दृकश्राव्यमाध्यम, श्वानपथक, अंगुलीमुद्रा,संगणक इत्यादी तंत्रांचा वापर करावा लागला. या सर्वांचा उद्देश, उत्कृष्ट पोलीस तपास, चांगल्या पध्दतीने पुरावे गोळा करून त्यांचे जतन करुन, आरोपींविरुद्ध न्यायालयात पोलीस केस भक्कमपणे उभी करणे व जास्तीत जास्त गुन्हेगारांना शिक्षा मिळविणे हाच आहे. वरील उद्देश लक्षात घेवुनच पोलीस कर्तव्य मेळाव्यात पोलीस खात्यात काम करणाऱ्या, सर्व तपासी अंमलदार व तपासास सहाय्य करणा-या पोलीस खात्याचे इतर घटक भाग घेवुन आपआपले तपास कौशल्य पणास लावत असतात.

या कर्तव्य मेळाव्यात विविध प्रकारचे गुन्हे, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, दहशतवादा विषयीचे गुन्हे तसेच इतर अत्याधुनिक पध्दतीने घडणारे गुन्हे व त्यांचा तपासशास्त्रोक्त पध्दतीने करण्यासाठी विविध स्पर्धा घेतल्या जातात. त्यामुळे तपासाचा दर्जा निश्चितच पणे उंचावतो. गेल्या काही वर्षांपासुन अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या कामगिरीचा आलेख अधिकाधिक उंचावत आहे. या स्पर्धांमध्ये भाग घेणारे अधिकारी व कर्मचारी यांनी स्पर्धा निकोप व चांगल्या

वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे तसेच पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येणार नाही, असे वर्तन ठेवावे व बक्षिस मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. आपआपले परिक्षेत्राचे/आयुक्तालयाचे नाव उन्नत करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आयोजन समितीचे अध्यक्ष, आयोजन समिती तसेच सदस्य यांचे आभार मानुन सर्वांना शुभेच्छा देवुन स्पर्धेचे उद्‌घाटन झाल्याचे घोषित केले.

त्यानंतर ६२ व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामधील विजेत्या स्पर्धकांचा गौरव करून त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर विजेता स्पर्धकांपैकी सुवर्णपदक विजेत्या पोहवा राखी खवले, सीआयडी, पुणे व कांस्यपदक विजेते पोना अनिल साळुंखे, एम्आयए यांच्या हस्ते क्रिडाज्योतीचे मैदानावर आगमन होवुन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस अधीक्षक, का व सं, सीआयडी, पुणे यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. सदर कार्यक्रमास श्री. बी. जी. शेखर, विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे, श्री. प्रविण साळुंखे, विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे पश्चिम, गु.अ.वि., श्री फत्तेसिंह पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे पुर्व, गु.अ.वि., श्री.दत्तात्रय मंडलिक, विशेष

पोलीस महानिरीक्षक, रा.गु.अ.कें., गु.अ.वि., श्री प्रदिप देशपांडे, संचालक, एम.आय.ए., श्री. संदिप दिवाण , पोलीस अधिक्षक, आ.गु.शा.-१, गु.अ.वि., श्रीमती पल्लवी बर्गे पोलीस अधिक्षक, आ.गु.शा.-२, गु.अ.वि., श्री. पाठक, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,गट क्र. २, श्रीमती निवा जैन, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १, निमंत्रित मान्यवर व अन्य अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दि.२६/११/२०१९

आज दि. २६/११/२०१९ रोजी पोलीस कर्तव्य मेळावा मधील स्पर्धेच्या दुस—या दिवशी एकुण ३ स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये १) 'सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन' यामध्ये अ)फिंगरप्रिंट प्रॅक्टिकल व ओरल, ब)ऑब्झर्वेशन टेस्ट, क) पोट्रेट, २) कम्प्युटर अवेरनेस यामध्ये ऑफिस ऑटोमेशन, ३) अॅन्टी सबोटेज (रूम चेकिंग) या स्पर्धा आज घेण्यात आल्या.

या दोन्ही स्पर्धांचा उपयोग पोलीसांना तपासादरम्यान विज्ञानाचे सहाय्य घेवुन व तंत्रज्ञानाची मदत घेवुन गुन्हे उघड करण्याकरीता केला जातो. या स्पर्धांमुळे पोलीसांचे कौशल्य विकसित होवुन गुन्हे उघडकिस आणण्यास जास्तीत जास्त उपयोग होतो.

फिंगरप्रिंट हा पोलीस तपासामध्ये महत्वाचा पुरावा असुन दोषसिध्दीच्यावेळी तो न्यायालयात निर्णायक व विशिष्ट पुरावा ठरू शकतो. गुन्हयाच्या घटनास्थळावर वगेवेगळया वस्तुंवर आरोपीचे फिंगरप्रिट मिळुन येतात. ते योग्य पध्दतीने डेव्हलप करून फिंगरप्रिंट ब्युरोकडे पाठविणे, हा देखील तपासातील

महत्वाचा भाग आहे. त्यामुळे फिंगरप्रिंट प्रॅक्टिकल व ओरल अशी स्पर्धा घेण्यात येते. तसेच ऑब्झर्वेशन या स्पर्धेमध्ये घटनास्थळाचे निरीक्षण करून शास्त्रियदृष्टया उपयोगी पुरावा हस्तगत करण्यासाठी स्पर्धा आयोजित केली जाते व पोर्ट्रेट या स्पर्धेमध्ये आरोपीच्या चेहरेपट्टीचे वर्णन ऐकुन आरोपीचे संभाव्य चित्र बनविणे, या स्पर्धेचे आयोजन केले जाते. पोर्ट्रेट या स्पर्धा प्रकारामुळे आरोपीच्या संभाव्य चित्रावरून आरोपी निष्पन्न करून गुन्हा उघड होण्यास मदत होते.

आज झालेल्या फिंगरप्रिंट प्रॅक्टिकल व ओरल या स्पर्धेत एकुण ४८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा प्रकारामध्ये अत्यंत चुरशीच्या लढतीत प्रथम क्रमांक पुणे शहराच्या सहा. पोलीस निरीक्षक अर्चना पाटील यांनी ( ४३. ५/५० गुण) तर व्दितीय क्रमांक नांदेड रेंजच्या श्रीदेवी पाटील यांनी ( ४३/५० गुण) मिळवला व एम्आयए चे पोलीस निरीक्षक महेश सरतापे यांना ४१.५/५० गुणांसह तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. परंतु इतर आयुक्तालय व परिक्षेत्रातील स्पर्धकांना त्यांच्या जवळपास देखील पोहचता आले नाही. तसेच ऑब्झर्वेशन व पोर्ट्रेट या स्पर्धेत एकुण २१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी ऑब्झर्वेशन या स्पर्धेत सोलापुर शहरचे पोना सतिश स्वामी

यांनी २६/५० गुणांसह सर्वोत्तम कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावला, तर अमरावती रेंजचे पोना प्रदिप लहुडकर यांनी २२/५० गुणांसह दुसरा क्रमांक मिळवला व पुणे सीआयडीचे पोहवा बी.एन्. दोरगे यांनी २०.५/५० गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. तसेच पोर्ट्रेट या स्पर्धेत औरंगाबाद शहरचे पोशि रविंद्र बहुले यांनी ४५/५० गुण मिळवुन प्रथम क्रमांक मिळवला, तर नागपुर शहरचे पोशि पंकज लोही यांनी ४३/५० गुणांसह व्दितीय व नवी मुंबईचे पोहवा महेश चव्हाण यांनी ४२.५/५० गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेमध्ये व्दितीय व तृतीय क्रमांकासाठी अटीतटीची लढत पाहण्यास मिळाली.

सध्याच्या डिजिटल युगामध्ये डिजिटल पुरावा व कम्प्युटरचे ज्ञान तपासण्यासाठी कम्प्युटर अवेरनेस ही स्पर्धा आयोजित केली जाते.

‘कम्प्युटर अवेरनेस’ या प्रकारामध्ये एकुण २४ स्पर्धक सहभागी झाले होते. एटीएस् मुंबईचे पोहवा उमेश शरणागते यांनी ८९/१०० गुणांसह प्रथम क्रमांक, तर सीआयडीच्या पोना स्वाती ढाले यांनी ८८/१०० गुणांसह व्दितीय क्रमांक व एम्आयएचे पोना बालाजी शिरपुरे यांनी

८१/१०० गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेत १ गुणाच्या फरकामुळे सीआयडीला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

'ॲन्टी सबोटेज रूम चेक' या स्पर्धेमध्ये अति महत्वाच्या व्यक्तींचे थांबण्याचे ठिकाण सुरक्षित होणेकामी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. यामध्ये अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या थांबण्याच्या ठिकाणी घातपात होवु नये, याकरीता घातपातविरोधी उपकरणांच्या सहाय्याने प्रात्यक्षिकातुन स्पर्धकांचे कसब तपासले जाते.

या स्पर्धा प्रकारात फोर्स वनचे पोना एन्.के. घुगे, पोहवा संतोष बंगाळे यांनी अनुक्रमे सुवर्णपदक व रौप्यपदक पटकावले, तर एम्आयएचे पोना आर.एस्.काळे यांनी रौप्य पदक पटकावले.

पोलीस कर्तव्य मेळाव्याचा उद्घाटन समारंभ दि. २७/११/२०१९ रोजी सायंकाळी ०४:३० वा. परेड ग्राऊंड, रा.रा.पो.बल गट क्र. २, रामटेकडी येथे आयोजित करण्यात आला आहे मा. डॉ. के. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे शुभहस्ते उद्घाटन संपन्न होणार आहे. तसेच समारोप समारंभ दि. ३०/११/२०१९ रोजी सायंकाळी

०३:५० वा. त्याच ठिकाणी आयोजित करण्यात आला असुन त्याचे प्रमुख पाहुणे मा. एस्.के.जायसवाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे आहेत.

Date: 26/11/2019

Today on 26/11/2019, the second day of 17th MSPDM-2019, following 3 competitions viz. 1) A) Fingerprint Practical and Oral and B) Observation Test under 'Scientific Aid to Investigation', 2) Office Automation in 'Computer Awareness' and 3) Anti-Sabotage (Room checking) competition were conducted .

Both the competitions are useful to police for detection of offences by use of science and technology. These competitions help police to develop their professional skills and maximum detection of offences.

Finger Print is important evidence in the investigation and can be special and useful in decision making at the time of ordering conviction in the court. Fingerprints are found on different things at the place of offence. Developing such fingerprints and sending to Finger Print Bureau is also important part in the investigation. Hence fingerprint practical and oral examination is conducted. Observation of place of offence and collection of scientific evidence is included in Observation Test. Portrait competition includes drawing a picture of the probable accused on the basis of available oral description of the accused. It helps to disclose the accused and detect the crime.

In today's Fingerprint Practical and Oral competition total 48 competitors participated. In a very tough competition API Archana Patil of Pune city secured first position (43.5 marks), Shridevi Patil of Nanded Range got second position (43 marks) and PI Mahesh Sartape of MIA had to remain contended with third position (41.5 marks). But competitors of other Commissionerates and Police Ranges lagged far behind them. Similarly, in Observation and Portrait competition 21 competitors participated. In Observation competition PN Satish Swami of Solapur city secured first position with 26 marks, PN Pradip Lahudkar was second with 22 marks and HC B.N. Dorge of CID Pune got third position with 20.5 marks. In Portrait competition PC Ravindra Bahule of Aurangabad city stood first with 45 marks, PC Pankaj Lohi of Nagpur city got second position with 43 marks and HC

Mahesh Chavan of Navi Mumbai stood third with 42.5 marks. A tough competition was seen in this event for second and third position.

In the present digital era to test the knowledge of computer 'Computer Awareness' competition is organized.

In 'Computer Awareness' competition total 24 competitors participated. HC Umesh Sarangate of ATS Mumbai secured first position with 89 marks, PN Swati Dhale of CID stood second with 88 marks and PN Balaji Shirpure of MIA got third position with 81 marks. CID had to remain contended with Silver Medal in this competition for difference of only one mark.

To ensure security for the stay of VVIP 'Anti-Sabotage Room Check' competition is conducted. In this test skills of the competitors to avoid any Sabotage at the place of stay of VVIPs is tested with help of Anti-Sabotage equipments through practical.

In this competition PN N.K.Ghuge of Force One got Gold medal, HC Santosh Bangale of Force One got Silver Medal and PN R.S. Kale of MIA got Bronze Medal.

Opening Ceremony of 17$^{th}$ MSPDM-2019 has been organized at Parade Ground of SRPF Gr.II, Ramtekdi, Pune on 27/11/2019 at 04.30 p.m. at the hands of Hon. Dr. K.Venkatesham, Commissioner of Police, Pune city. Closing Ceremony will be held on 30/11/2019 at 03.50 p.m. at the Parade Ground of SRPF Gr. II, Ramtekdi, Pune. Chief Guest of the programme will be Hon. S.K.Jaiswal, Director General of Police, MS, Mumbai.


कवायत मैदान
१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१९, पुणे
सुस्वागतम्
१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१९ पुणे
१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१९ पुणे




17th Maharashtra State Police Duty Meet 2019, Pune
17th Maharashtra State Police Duty Meet 2019, Pune


17th Maharashtra State Police Duty Meet 2019, Pune
17th Maharashtra State Police Duty Meet 2019, Pune


17th Maharashtra State Police Duty Meet 2019, Pune
17th Maharashtra State Police Duty Meet 2019, Pune